जळगाव तरुण भारत
Main Edition | 2022-06-14 | Page- 3
epaper.tarunbharatjalgaon.com

# आशा फौंडेशन पुन्हा नव्याने कार्यरत

## उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी सुजाता बोरकर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव/धुळे, १२ जून**

कोरोना महामारीच्या व्यत्ययानंतर आशा फौंडेशनच्या कार्याची पुन्हा नव्याने सुरुवात होत असून येथे आधीपासून कार्यरत सुजाता बोरकर यांची संस्थेच्या उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. अनेक नाविन्यपूर्ण शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवून शिक्षण, आरोग्य व नागरी कर्तव्ये या क्षेत्रात आशा फौंडेशनने आपला ठसा उमटविला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात तरुणांसाठी रोजगार कौशल्य विकसन कार्यशाळा आयोजित करणे, अध्ययन अक्षमतेविषयी जागरूकता



निर्माण करणारा तसेच अभ्यासात मागे असलेल्या शालेय विद्यार्थ्यांसाठी जळगावातील सरासरी १५ शाळांमधून राबविण्यात आलेला 'शार्प' हा प्रकल्प, करिअर मार्गदर्शन, संशोधक व कल्पकवृत्ती जोपासणारे डॉ. एपीजे अब्दुल कलाम इनोव्हेशन सेन्टर आदी उपक्रम संस्था चालवते. कोरोना महामारी व त्यानंतर टाळेबंदीत फौंडेशनचे उपक्रम बंद होते. आता ते कार्यरत करुन सुजाता बोरकर यांची संस्थेच्या उत्तर पश्चिम महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारी संचालकपदी नियुक्ती करण्यात आल्याचे संस्थेचे आधारस्तंभ व संस्थापक संजीव दहिवदकर यांनी सांगितले.

आशा फौंडेशनच्या उत्तर पश्चिम शाखेच्या कार्यकारी संचालक म्हणून कार्यभार स्वीकारतांना या नामांकित संस्थेत कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती होणे हा मी माझा गौरव समजते. माझ्या अनुभवाचा संस्थेला अधिकाधिक लाभ होण्यासाठी जोमाने काम करेल, असा विश्वास सुजाता बोरकर यांनी व्यक्त केला. संस्थेच्या या उद्दात्त कार्यात मदत करणारे आश्रयदाते व देणगीदारांनी पूर्वीप्रमाणेच सहकार्य करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

Powered by iDocuments